संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

✻ सर्व प्रकारचे डिजिटल एक्स–रे ✻ गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे ✻ पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन ✻ वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी ✻ इंटरव्हेशनल सोनोग्राफी ✻ सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ९७ वा ● ● बुधवार दि. १० जानेवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# ठाकरे की शिंदे, कुणाचे आमदार होणार अपात्र ?

## आज निकाल : आमदारांमध्ये धाकधूक



**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचं काऊंटडाऊन सुरू झाले असून आज १० जानेवारी रोजी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आमदार अपात्रतेवर निकाल देणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे? कुणाचे आमदार अपात्र ठरतील, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून आहे. विशेष बाब म्हणजे, या निकालावर राज्यातील महायुती सरकारचं भवितव्य अवलंबून राहणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विद्यमान सरकारमधील चार मंत्र्यांवर अपात्रतेची टांगती तलवार आहे. जर अध्यक्षांनी शिंदे गटाविरोधात निकाल दिला, तर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागेल.

दुसरीकडे निकाल आमच्या बाजुनेच लागेल जर, नाही लागला तर जनतेचा लोकशाहीवर लोकांचा विश्वास राहणार नाही. याचा परिणाम निवडणुकांवरही होईल. शिवसेना कोणाची याचं उत्तर सगळ्यांना माहित आहे, असं ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाईल यांनी म्हटलं आहे.

आमदार अपात्रतेच्या निकाल येण्यास काही तासांचा अवधी शिल्लक असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. वर्षा बंगल्यावर झालेल्या भेटीत दोघांमध्ये तब्बल २ तास चर्चा झाल्याची माहिती आहे. नेमकी कोणत्या कारणावर चर्चा झाली? याचे कारण अद्यापही गुलदस्त्यात असली तरी यावरून मोठी टीका सुरु आहे. विधानसभा अध्यक्ष आज बुधवारी ४ वाजता आमदार अपात्रतेचा निकाल जाहीर करतील. निकालपत्राचा मसुदा कायदेशीर अभिप्रायासाठी दिल्लीतील कायदेतज्ज्ञांकडे पाठविला असल्याची माहिती देखील मिळत आहे.

**'मी कुणाच्याही दबावाला... : राहुल नार्वेकर**

राज्यातील सत्तासंघर्षावर बुधवारी विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर निकाल देणार आहेत. मात्र त्यापूर्वीच त्यांनी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा बंगल्यावर जाऊन भेट घेतली. यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला असून नार्वेकरांवर सेटलमेंटचा गंभीर आरोप केला जात आहे. यावर नार्वेकरांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा चांगलाच समाचार घेतला आहे. मुख्यमंत्री राहिलेल्या व्यक्तीला विधानसभाध्यक्षांच्या कामकाजाची माहिती असते. मात्र हेतूपुरस्पर ते बिनबुडाचे आरोप करीत असल्याची टीका नार्वेकरांनी ठाकरेंवर केली आहे. जो निर्णय घेणार आहे तो संविधानातील तरतुदीनुसार असेल. १९८६ चे नियम आहेत, त्याआधावर निर्णय घेईल. तसेच विधिमंडळाचे पायंडे आहेत, याचा विचार करूनच निर्णय घेईल. त्यामुळे राज्यातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. कोर्टात जायचा अधिकार सर्वांना आहे. कुणी काहीही बोलले तरी त्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही,' असे ठणकावत नार्वेकरांनी 'निकाल दिलेल्या वेळमर्यादेतच घेणार, असेही स्पष्ट केले.

**...थोडी खुशी थोडा गम : ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम**

आमदार अपात्रतेसंबंधी अध्यक्ष काय निकाल देतात हे जरी महत्त्वाचं असलं तरी हा निकाल थोडी ख़ुशी थोडा गम अशा प्रकारचा असू शकतो. सत्ता संघर्षाबाबद ज्या गटाला वाटतं असेल त्या गटाला उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात दादा मागता येईल, असं मत ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी मांडलं आहे. निकाल देताना घटनापीठाच्या निर्णयानुसार अध्यक्ष निर्णय देतील. घटनापीठाच्या निर्णयानंतर अध्यक्ष टिपाटिपणी करू शकतात. जर गटाला वाटलं अध्यक्षाची टिपाटिपणी योग नाही तर ते दाद मागू शकतात. निकालाबाबद अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालय कधी देईल हे सांगता येत नाही, कारण न्यायालयाला दोन्ही बाजू पुन्हा ऐकूण घ्याव्या लागतील. मात्र या निकालानंतर पुन्हा घटनापीठ स्थापन करण्याची गरज नाही.

# गळवेवाडी येथे वृद्धेस जीवे मारण्याची धमकी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील गळवेवाडी येथे वृद्धेस अंगावर धावून जात शिवीगाळी करून बंदूक आणून तुला मारून टाकतो अशी धमकी दिल्याने आरोपी विरुद्ध आटपाडी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आटपाडी पोलीस ठाणे मधुन

याबाबत अधिक माहिती अशी, आटपाडी तालुक्यातील गळवेवाडी येथे बायनाबाई श्रीमंत घेरडे (वय ७०) या वृद्ध राहण्यास आहेत. यातील आरोपी पांडुरंग श्रीमंत घेरडे याने बायनाबाई हिच्या अंगावर धावून जात शिवीगाळी करून बंदूक आणून तुला मारून टाकतो अशी दिली. तर तिचा मुलगा गुलाब व सून वैशाली यांनाही शिवीगाळी व दमदाटी करून केली आहे.

बायनाबाई घेरडे या वृद्ध महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी पांडुरंग घेरडे याच्या विरुद्ध आटपाडी पोलिसात गुन्हा नोंद झाला असून सदरचा गुन्हा दिनांक ०९ रोजी घडला असून पोलीस अधिक तपास करत आहेत,

# खरसुंडी येथे ११ रोजी त्रैवार्षिक धाकटी जकाई यात्रा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**खरसुंडी :** खरसुंडी ता. आटपाडी येथील धाकटी जकाई देवीची त्रैवार्षिक यात्रा गुरुवार ता. ११ रोजी होणार आहे. यात्रे निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

खरसुंडी येथे बलवडी घाटाच्या पायथ्याला सिद्धनाथांच्या पत्नी जकाई देवीचे तीर्थक्षेत्र आहे. डोंगर कपारीत निसर्गरम्य ठिकाणी धाकटी जकाई देवीचे पुरातन मंदिर आहे. त्या ठिकाणी तीन वर्षातून एकदा मार्गशीर्ष अमावस्येस श्री सिद्धनाथ आपल्याला लवाजम्यासह भेटीस जातात. या भेट सोहळ्यानिमित्त या ठिकाणी मोठी यात्रा भरते.



धाकटी जकाई

गुरुवार ता. ११ रोजी सकाळी ९.३० वाजता श्रींचे पालखीचे मुख्य मंदिरातून जकाई भेटीसाठी पालखीतुन प्रस्थान होणार आहे. ९.४५ वाजता जोगेश्वरी मंदिराजवळ ध्वज पूजन होणार आहे. यात्रेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले असून त्या ठिकाणी शिवानंद स्वामी प्रस्तुत भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

तरी या यात्रेचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजन ग्रामस्थ व देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# ईडीकडून तब्बल १२ तासांपासून रविंद्र वायकरांची चौकशी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जोगेश्वरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रविंद्र वायकर यांच्या निवासस्थानी ईडीची छापेमारी सुरू आहे. काल सकाळी साडेआठ वाजले पासून ईडीचे १२ अधिकारी वायकर यांच्या निवासस्थानी कागद पत्रांची तपासणी करत आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जोगेश्वरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रविंद्र वायकर यांच्या निवासस्थानी ईडीची छापेमारी सुरू आहे. काल सकाळी साडेआठ वाजले पासून ईडीचे १२ अधिकारी वायकर यांच्या निवासस्थानी कागद पत्रांची तपासणी करत आहेत.

जोगेश्वरी पूर्वेकडील मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या जागेवर वायकर यांनी पंचतारांकित हॉटेल सुरू करण्यासाठी पालिकेकडून परवानगी घेतली. यात सुमारे



रविंद्र वायकर

५०० कोटीचा गैरव्यवहार मनी लॉन्ड्रीग झाल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. वायकर आणि त्यांचे चार व्यावसायिक भागीदार यांच्यावर आझाद मैदान पोलीस ठाण्यात सप्टेंबर २०२३ मध्ये गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. यानंतर ईडीने नोव्हेंबर २०२३ मध्ये एसीआर दाखल केला होता. त्यानंतर आज सकाळी येडीचे बारा अधिकारी या ठिकाणी येऊन कागदपत्रांची पाहणी करत आहेत.

नोव्हेंबर २०२३ मध्ये रवींद्र वायकर यांच्यासह सहा जणांविरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गुन्हा दाखल केला होता.

जोगेश्वरीमधील सुप्रिमो क्लबच्या जागेचा गैरवापर तसेच, तिथे हॉटेल बांधताना तथ्य लपवल्याच्या आरोपाखाली वायकरांविरोधात आर्थिक गुन्हे शाखेकडून गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हायाबाबत अद्याप कोणालाही समन्स करण्यात आले नाही. मात्र आज या प्रकरणातील सर्व व्यवसायिक आणि रविंद्र वायकरांच्या घरावर ईडीची धाड पडली आहे. उद्या शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर निकाल जाहीर करणार आहेत.

निकालाच्या आदल्या दिवशीच ठाकरे गटातील आमदार रविंद्र वायकर यांच्या घरावर ईडीकडून छापेमारी करण्यात आली आहे.

# खुनी हल्ल्यातील जखमीचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** इंदिरानगर झोपडपट्टीतील रवी रोहिदास काळे (वय ४२) यांच्यावर दोघांनी कोयत्याने हल्ला करून जखमी केले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. संशयित दोघांना अटक करण्यात आली. सोमवारी रात्री ही घटना घडली होती. रोहित रवी सकट (वय २४, रा. इंदिरानगर, सांगली) असे अटक केलेल्याचे नाव आहे, तर दुसरा संशयित अल्पवयीन आहे. त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

काळे मजुरीचे काम करत होते. काही महिन्यांपूर्वी त्यांचा संशयितांशी किरकोळ कारणावरून वाद झाला होता. संशयितांनी त्यांना 'तुला बघून घेतो', अशी धमकी दिली होती. तेव्हापासून ते एकमेकांशी बोलत नव्हते.



रवी काळे

काळे सोमवारी रात्री साडेनऊ वाजता जेवण करून इंदिरानगरमधील अण्णा भाऊ साठे कट्ट्यावर बसले होते. संशयित तिथे आले. त्यांनी पूर्वी झालेला वाद उकरून काढला. यातून त्यांच्यात जोरदार वाद सुरू झाला. त्याचे पर्यवसान मारामारीत झाले. संशयितांनी कोयता काढून काळे यांच्यावर हल्ला केला. डोक्यात, छातीवर वार केले. यामध्ये ते रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यानंतरही संशयितांनी त्यांच्या उजव्या पायावर वार केले. ते आरडाओरड करू लागले. परिसरातील लोक जमा होताच संशयित पसार झाले. काळे यांना सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. त्यांची प्रकृती चिंताजनकच होती. उपचार सुरू असताना त्यांचा पहाटे चार वाजता मृत्यू झाला.

# पुणे लोकसभेसाठी माजी मंत्री विश्वजीत कदम निरीक्षक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** आगामी लोकसभा निवडणुक पुणे साठी माजी राज्यमंत्री, आमदार विश्वजीत कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेसकडून कोणाला उमेदवारी मिळणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. लोकसभेसाठी येत्या मार्च–एप्रिल महिन्यात निवडणूक होणार आहे. त्यासंदर्भातील आचारसंहिता फेब्रुवारी महिन्यात सुरू होईल, अशी शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन काँग्रेसकडून निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पक्षाच्या केंद्रीय मंडळ आणि प्रदेश काँग्रेसकडून निरीक्षकांची नियुक्ती करण्याची सूचना करण्यात आली होती. त्यानुसार पुण्यातील इच्छुक उमेदवारांना अन्य लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे पुण्याचा उमेदवार कोण, असा प्रश्नही उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.



विश्वजित कदम

पुणे लोकसभेसाठी काँग्रेसकडून आमदार रवींद्र धंगेकर, ड. अभय छाजेड, संजय बालगुडे आणि मोहन जोशी यांनी पक्षाकडे इच्छुक म्हणून नाव दिले आहे. मात्र धंगेकर यांना सातारा लोकसभा, छाजेड यांना हातकणंगले लोकसभा, संजय बालगुडे यांना माढा लोकसभा तर मोहन जोशी यांना अहमदनगर लोकसभा मतदारसंघाची जबाबादीर देण्यात आली आहे. पुण्याची जबाबदारी माजी मंत्री, आमदार विश्वजीत कदम यांच्याकडे देण्यात आली आहे. मतदारासंघाची बांधणी करण्याची जबाबदारी या सर्वांना आहे. इच्छुक उमेदवारांना पुण्यापासून बाहेर ठेवल्याने आणि कदम यांना पुण्याची जबाबदारी दिल्याने कदम पुन्हा उमेदवार असणार का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

# पती-पत्नी ची सोशल मिडियातून बदनामी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** सोशल मिडिया इंस्टाग्राम या सोशल मिडियातून फेक अकाऊंट उघडून पती व पत्नीची बदनामी केल्याप्रकरणी आरोपी विरुद्ध आटपाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आटपाडी पोलीस ठाणे मधुन

याबाबत अधिक माहिती अशी, फिर्यादी महिला ही सध्या आटपाडी तालुक्यातील लेंगरेवाडी पाटी येथे राहण्यास आहे. यातील आरोपी प्रथमेश अरुण धोत्रे रा. तासगाव याने सोशल मिडिया इंस्टाग्राम या सोशल मिडियातून फेक अकाऊंट तयार केले. त्या अकाऊंट वरून आरोपीणे फिर्यादी महिलेस धमकीचा मेसेज दिला. तसेच फिर्यादी महिलेची बदनामी करण्याच्या हेतूने फिर्यादी महिलेच्या पतीस व फिर्यादी हिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे.

याबाबत महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध आटपाडी पोलिसात फिर्याद दाखल करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# देशमुख महाविद्यालयात बीएससी व बीसीए विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयांमध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत बीएससी व बीसीए विभागामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'आयटी उद्योगात करिअरच्या संधी' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी अभिजीत गटाडे यांनी दोन सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचे प्रास्ताविक अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. किशोर जाधव यांनी करत, कार्यशाळा आयोजन करण्याचा उद्देश सांगितला. तसेच विद्यापीठाकडून कोणत्या संधी उपलब्ध होतील या विषयी माहिती दिली.



आटपाडी : 'आयटी उद्योगात करिअरच्या संधी' या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले व मंचावर उपस्थित मान्यवर

अभिजीत गटाडे म्हणाले, तंत्रज्ञानाने उद्योग क्षेत्रात प्रवेश केला आणि त्याचा प्रचंड विकास झाला. आयटी व्यावसायिक विविध शासकीय, औद्योगिक वैयक्तिक कार्यासाठी संगणक, हार्डवेअर, सॉफ्टवेअरची रचना, समर्थन आणि देखभाल करतात. आणि त्याच्या कौशल्य आणि अनुभवाची मागणी केली जाते. त्यामुळे या क्षेत्रात गोल्डन अपॉर्च्युनिटीज फॉर करियर इन आयटी आहेत. आयटी मध्ये नोकऱ्यासाठी कोणती शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे याची माहिती दिली. माहिती तंत्रज्ञान मध्ये करिअरचे मार्ग कोणते आहेत ही स्पष्ट केले. तसेच आयटी चा वापर कोठे केला जातो. आयटी क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी काही कोर्सेस विषयी माहिती दिली दर, आयटी इंडस्ट्री मध्ये नोकरी कशी मिळते माहिती दिली.

या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले हे होते. कार्यशाळेमध्ये रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.दादासो काळे व बीसीए विभागाचे विभाग प्रमुख प्रा.अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन बीएससी विभागाचे डॉ.संदीप विभुते यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन प्रा.सुतार यांनी केले.

# संपादकीय

## बाय बाय मालदीव !

मालदीव हा भारताचा जवळचा शेजारी देश. दक्षिण आशियात एक मित्र असावा आणि त्याच्याशी संबंध चांगले या हेतून शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी भारताने लष्करही मालदीवच्या दिमतीला तयार ठेवलेले होते. अशा या मालदीव देशाला २०२२ या वर्षी निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्ष मात्र भारत विरोधी निघाला. नवीन निवडून आलेला सत्ताधारी चीनधार्जिणा होता. नुकत्याच झालेल्या इस्त्रायल आणि हमास यांच्या युद्धाचा संदर्भ देत नव्या मंत्रिमंडळातील काही बेताल मंत्र्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह असे शेरे मारले आणि ते सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. तर दुसरीकडे मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्षद्वीपला समुद्रकिनाऱ्यास भेट दिली व लक्षद्वीपला भेट द्या, असे त्यांनी सोशल मीडियावर आवाहन केले. पंतप्रधानांच्या या भेटीवर मालदीवमधील बिनडोक मंत्र्यांनी शिवराळ भाषेत टीका केली.

मालदीवमध्ये येणार्या पर्यटकांपैकी भारतीय लोकांची संख्या जवळपास ८० टक्के होती. ‘बायकॉट मालदीव’ म्हणजे मालदीवला जाणेच नको, ही भावना जेमतेम १२ तासांमध्ये देशभर पोहोचली. कधी नव्हे ते फिल्मी सितारे यांनीही तत्काळ मालदीवचा निषेध केला. अवघ्या काही तासांत आठ हजारपेक्षा जास्त लोकांनी मालदीवमधील हॉटेल बुकिंग रद्द केले. २५ हजार पेक्षा जास्त विमान तिकिटे रद्द केली आणि यापुढे मालदीवला जायचे नाही, असे कोणीही न सांगता भारतीय जनतेने ठरवले.

पर्यटनावर होणारा परिणाम लक्षात येताच मालदीवच्या सरकारने पंतप्रधानांवर आक्षेपार्ह टिप्पणी केलेल्या मंत्र्यांची हकालपट्टी केली. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. भारतीय जनसामान्यांचा हा बुलंद आवाज मालदीवची अर्थव्यवस्था खिळखिळी करून गेला. धार्मिक आंधळेपणाची पट्टी डोळ्यावर चढविल्यानंतर भविष्य धूसर होते आणि रस्त्यावर यावे लागते हे मालदीवमुळे सर्व जगाला दिसून आले. आणखी पाच वर्षांनंतर कोणे एकेकाळी मालदीव नावाचा देश आपल्या निसर्गसुंदर




## सावित्रीबाईंसोबत लढणाऱ्या पहिल्या मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख

फातिमा शेख यांचा जन्म ९ जानेवारी १८३१ मध्ये पुण्यात, झाला. त्या काळात स्त्रीयांनाही शिक्षण देण्याची गरज आहे ही कल्पनाच नव्हती. महिलांना घराच्या हद्दीत ठेवले जात होते आणि त्यांना अभ्यास करू दिला जात नव्हता. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी मिळून दलित, मुस्लीम स्त्रिया आणि बालके यांना वर्ग, धर्म किंवा लिंगाच्या आधारावर शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला. या योगदानासाठी फातिमा शेख या आधुनिक भारतातील पहिल्या महिला मुस्लिम शिक्षिका बनल्या.

१८४८ मध्ये मुलींसाठी भारतातील पहिल्या शाळांपैकी एक सह-स्थापना केली. आणि तिचे नाव स्वदेशी लायब्ररी ठेवले. फातिमा शेख आणि सावित्रीबाई फुले यांची भेट झाली जेव्हा त्या दोघींनी ‘सिंथिया फरार’ या अमेरिकन मिशनरीद्वारे चालवल्या जाणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. फातिमा शेख यांनी ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अशा वेळी पाठिंबा दिला. जेव्हा काही कट्टरवाद्यांना त्यांची महिला शिक्षित करण्याची मोहीम आवडली नाही. त्यामूळे दोघांनाही घराबाहेर काढण्यात आले. मग फातिमाजींनी यांनी या दोघांना आपल्या घरात राहण्यासाठी जागा तर दिलीच, पण मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यात शाळा उघडण्याचीही जागा दिली.

त्यावेळी शूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितीत फातिमा शेख केवळ शाळेतच शिकवत नसून प्रत्येक घरोघरी जाऊन मुलींना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करत होत्या. त्यामुळे त्यांना समाजातील काही घटकांच्या रोषालाही सामोरे जावे लागले. सावित्रीबाई फुले यांनी स्थापन केलेल्या पाचही शाळांमध्ये त्यांनी शिक्षणाच्या प्रसाराचे काम केले. त्यांनी कधीही कोणत्याही मुलामध्ये धर्म-जातीच्या आधारे फूट पाडली नाही. तर प्रत्येक धर्माच्या मुलांना आपुलकीने शिकवण्याचे कौतुकास्पद काम केले.


फातिमा शेख

या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांना सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणून मान्यता मिळाली. शेख यांनी घरोघरी जाऊन त्यांच्या समाजातील दलितांना स्वदेशी ग्रंथालयांमध्ये शिकण्यासाठी आणि भारतीय जातिव्यवस्थेच्या कठोरतेपासून वाचण्यासाठी आमंत्रित केले. त्याला मोठ्या कट्टरपंथीयांच्या प्रतिकारालाही सामोरे जावे लागले. पण, फातिमाजी स्त्रीशिक्षणासाठी लढण्यात कधीच मागे हटल्या नाहीत. सावित्रीबाईंना फातिमांची किती साथ होती ते एका पत्रातून कळते. सावित्रीबाईंनी ज्योतिबांना १०ऑक्टोबर १८५६ मध्ये लिहीलेल्या एका पत्रात त्या म्हणतात की, माझी काळजी करू नका, तब्येत ठीक होताच मी पुण्यात परत येईन. फातिमाला सध्या त्रास होत असेल पण ती कुरकुर करणार नाही. अशा या धाडसी शिक्षिकेबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. ज्योतिबा आणि सावित्रींबद्दल लिहीणाऱ्या काही मोठ्या लेखकांनाही याबद्दल फातिमाजींबद्दल पुसटशी माहिती आहे. त्यामूळे फातिमाजींचे कार्य ठळकपणे मांडता येत नाही. पण, तरीही त्यांचे मुलींच्या शिक्षणातील योगदान दुर्लक्षित करता येण्यासारखे बिलकूल नाही. अशा या थोर शिक्षिकेला सलाम!

# राज्यात १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड होणार : एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** वातावरण बदलाच्या आजच्या काळात कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी बांबू लागवड हा चांगला पर्याय आहे. येत्या काळात राज्यात १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे आज पहिल्या पर्यावरणीय शाश्वतता शिखर परिषदेचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झालेत्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, गोदरेज उद्योग समूहाचे नादिर गोदरेज, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव सचिव अनुप कुमार, वन विभागाचे सचिव वेणुगोपाल रेड्डी आदी उपस्थित होते.



मुंबई : पर्यावरणीय शाश्वतता शिखर परिषदेचे उद्घाटन करताना एकनाथ शिंदे व उपस्थित मान्यवर

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सध्या निसर्ग चक्र बदलत असून अवकाळी, गारपीट, अतिवृष्टी अशा समस्यांचा सामना करावा लागत आहे. हे सर्व पर्यावरण बदलामुळे होत आहे. यावर पर्यावरणाचे संवर्धन हा एकमेव उपाय आहे. कार्बनचे उत्सर्जन कमी झाले करणे यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बांबू लागवड उपक्रम हाती घेण्यात आला आहे. बांबूमध्ये पर्यावरण समतोल राखण्याची प्रचंड क्षमता आहे. एक बांबू ३२० किलो प्राणवायू निर्माण करते. कार्बनचे मोठ्या प्रमाणावर शोषण करतो. इतर वृक्षांच्या तुलनेत ३० टक्के जास्त कार्बन बांबू शोषतो. बांबू लागवडीतून शेतकऱ्यांनाही फायदा होतो. त्यांचा आर्थिकस्तर उंचावण्यासाठी मदत होते. ऊसापेक्षा बाबू लागवड जास्त फायदेशीर आहे. बांबूपासून विविध उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होत आहे.

शहरी भागातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे मुंबईतील प्रदूषणाचा निर्देशांक ३५० वरून ८० ते ११० पर्यंत कमी झाला आहे. शहरी भागातील प्रदूषण रोखण्यासाठी अर्बन फॉरेस्ट तयार करण्यात येत आहे. पश्चिम आणि पूर्व या दोन्ही द्रुतगती मार्गांच्या दोन्ही बाजूला बांबू लागवडीचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व महामार्गाच्या दुतर्फा बांबू लावण्याचा निर्णयही राज्य शासनाने घेतला आहे. बांबू हा शेतकऱ्यांसाठी फायद्याचा आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी बांबू शेतीकडे वळावे. आज बांबूची मागणी मोठी आहे. पण उत्पादन कमी आहे. बायोमास म्हणून ही बांबूचा उपयोग होतो. त्यापासून इथेनॉल निर्मिती होते, औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये इंधन म्हणून बांबूचा वापर करण्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे भविष्यात बांबूला मोठी मागणी असणार आहे. बांबू पिकाचा समावेश मनरेगामध्ये करण्यात आला आहे. बांबू लागवडीसाठी प्रती हेक्टरी ७ लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणाऱ्या या पिकाकडे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

शासन शेतकऱ्यांच्या विकासासाठी काम करत आहे. शेतकऱ्यांच्या आणि पर्यावरणाच्या फायद्याच्या अनेक योजना शासन राबवत आहे. जलयुक्त शिवारही अशीच एक योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून भूजल पातळी वाढण्यास मदत होत आहे. राज्याच्या विकासाचे अनेक प्रकल्प शासन राबवत आहे. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, ट्रान्स हार्बर सी लिंक असे प्रकल्प मार्गी लावण्यात आले. हे विकास प्रकल्प राबवताना पर्यावरणाची योग्यती काळजी घेतल्याचेही मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत श्री. पटेल म्हणाले, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यामुळे आज महाराष्ट्रात बांबूला राजाश्रय मिळाला आहे. त्यांच्या प्रयत्नातून राज्यात मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड होत आहे. या शिखर परिषदेस जगभरातील संशोधक आले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा उपस्थित शेतकऱ्यांना फायदा होईल. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रुपाली देशपांडे यांनी केले.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस






# ईएसआयसी रूग्णालय, कामगार भवनसाठी जागा निश्चितीचे काम तातडीने करावे : डॉ. सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** ईएसआयसी रूग्णालय व कामगार भवनसाठी जागा निश्चितीचे काम लवकरात लवकर करावे, अशा सूचना कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे केल्या. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित प्राथमिक बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, ईएसआयसीचे पुणे विभागाचे प्रमुख पी. सुदर्शनन, उपसंचालक चंद्रशेखर पाटील, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वसुंधरा जाधव, मिरजच्या तहसीलदार अपर्णा मोरे धुमाळ, सरकारी कामगार अधिकारी चंद्रकांत साळुंखे आदि उपस्थित होते.



सांगली : ईएसआयसी रूग्णालय व कामगार भवनसाठी जागा निश्चिती बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित अधिकारी


पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या कामगारांच्या उपचारासाठी सांगली येथे १०० खाटांचे रूग्णालय सप्टेंबर २०२३ मध्ये मंजूर करण्यात आले आहे. त्यासाठी ५ एकर जागेची आवश्यकता आहे. सदर जागा निश्चित करताना एमआयडीसी व शहर यांना जवळची असावी. संबंधित सर्व यंत्रणांनी उपलब्ध शासकीय जागांचे पर्याय प्रत्यक्ष भेट देऊन तपासावेत. या रूग्णालयात राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या कामगारांना मोफत वैद्यकीय उपचार मिळतील, असे ते म्हणाले.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, प्रत्येक जिल्ह्यात एक कामगार भवन बांधण्याच्या पार्श्वभूमिवर सांगलीच्या कामगार भवनसाठी जवळपास एक एकर पेक्षा जास्त जागा आवश्यक आहे. या इमारतीत कामगार कल्याण, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, सुरक्षा रक्षक कार्यालय, सांगली जिल्हा माथाडी कामगार कार्यालय अशा कामगारांशी संबंधित सर्व कार्यालये असतील. त्यासाठी एमआयडीसीमध्ये जागा उपलब्धीचे पर्याय प्रत्यक्ष भेट देऊन तपासावेत व जागा मागणीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव यांना मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष आणि मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव यांनी मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. जाधव यांनी जखमी अवस्थेत स्वतःचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी दावा केला आहे की, माथाडी संघटनेसंदर्भात चर्चा करण्यासाठी मी राज ठाकरे यांच्या घरी गेलो होतो. तिथे मला अमित ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, या मारहाणीनंतर जाधव यांना खारघर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. महेश जाधव यांनी म्हटलं आहे की, काही माथाडी कामगारांच्या मागण्या घेऊन मी अमित ठाकरे यांना भेटण्यासाठी राजगड (मनसेचं कार्यालय) येथे गेलो होतो. तिथे अमित ठाकरे यांनी राज ठाकरे यांचा मित्र विनय अग्रवाल याच्या सांगण्यावरून मला मारहाण केली. हे ठाकरे मराठी माणसाचे कैवारी नाहीत, ते केवळ दलाल आहेत. त्यांचा पक्ष दलाल आहे. केवळ खंडणी वसूल करणारा पक्ष आहे. या फेसबूक लाईव्हनंतर ते लोक माझा जीव घेतील, मला मारून टाकतील. मला काही झाल्यास राज आणि अमित ठाकरे हे दोघेच जबाबदार असतील.



अमित ठाकरे

या व्हायरल व्हिडीओनंतर मनसेने महेश जाधव यांच्यासह कामगार सेनेवर कारवाई केली आहे. मनसेने एक परिपत्रक जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की, सर्व महाराष्ट्र सैनिकांना कळवण्यात येत आहे की, राज ठाकरे यांच्या आदेशानुसार मराठी कामगार सेना या संघटनेची आणि संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येत आहे. मराठी कामगार सेना या संघटनेचा आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा आजपासून मनसेशी अथवा पक्षाची अंगीकृत संघटना महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे मराठी कामगार सेनेच्या कोणत्याही भूमिकेशी, मराठी कामगार सेनेच्या पदाधिकारी आणि सदस्यांशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राजकीय पक्षाचा आणि पक्षाच्या इतर अंगीकृत संघटनांचा कोणताही संबंध नसेल.

# राशिद खान यांच्यावर आज अंत्यसंस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोलकाता :** हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील मातबर आणि लोकप्रिय गायक उस्ताद राशिद खान यांचे मंगळवारी दुपारी ३.४५ च्या सुमारास प्रोस्टेट कर्करोगाने निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज, बुधवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील.



राशिद खान

काही महिन्यांपूर्वी त्यांना कर्करोगाचे निदान झाले होते. डिसेंबरमध्ये प्रकृती ढासळल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. आम्ही आमच्या परीने पूर्ण प्रयत्न केले, पण त्यांना वाचवण्यात यश आले नाही, असे रुग्णालयाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. राशिद खान यांचे पार्थिव बुधवारी अंत्यदर्शनासाठी रवींद्र सदन येथे ठेवले जाईल. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील. त्यांना २१ बंदुकांची सलामी दिली जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.




# ग्रंथोत्सवाच्या आयोजनासाठी जिल्हा समन्वय समितीची बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत ग्रंथोत्सव-२०२३ चे आयोजन दि. ८ व ९ फेब्रुवारी २०२४ रोजी पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील स्मारक, जुने स्टेशन चौक सांगली येथे करण्यात येणार आहे. या ग्रंथोत्सवाच्या आयोजनाबाबत जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या दालनामध्ये सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीस जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे, जिल्हा साहित्य परिषदेचे प्रा. प्रदीप पाटील, जिल्हा प्रकाशक संघटनेचे अमर कदम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिनिधी नरेंद्र माळी यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमाची रूपरेखा, ग्रंथदिंडी, स्टॉल, व्याख्याने आदि विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ग्रामीण व शहरी भागातील लोकांमध्ये वाचनसंस्कृतीमध्ये वाढ व्हावी या हेतूने राज्य शासनातर्फे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाण विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत यासाठी तसेच प्रकाशक व ग्रंथ विक्रेता यांना ग्रंथ विक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी हा ग्रंथमहोत्सव आयोजनाचा मुख्य उद्देश आहे.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातपदभरती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सांगली यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलींचे वसतिगृह येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारी पध्दतीने अतिरीक्त अशासकीय वसतीगृह अधिक्षिका यांचे एक पद माजी सैनिक विधवा पत्नी / माजी सैनिक पत्नी मधून भरावयाचे आहे. अर्जदार यांना संगणक तसेच मराठी टंकलेखनचे ज्ञान असणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी अर्ज व अन्य आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.४५ वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सांगली येथे उपस्थित रहावे. निवड करण्याचे किंवा एखादा अर्ज कोणतेही कारण न देता निकाली काढण्याचे सर्व अधिकार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सांगली यांनी राखून ठेवले असून अधिक माहितीसाठी ०२३३-२९९०७१२ या दुरध्वनीवर संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसायासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील समुदाय आधारीत संस्थांकडून मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविण्यासाठी अर्ज मागविण्यात आले असून इच्छुकांनी परिपूर्ण अर्ज दिनांक २० जानेवारी २०२४ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प संचालक आत्मा जांबुवंत घोडके यांनी केले आहे.

अर्ज हे शेतमाल, मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पांसाठी आहेत. अर्ज सादर करण्यासाठी पात्र समुदाय आधारित संस्थांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी आणि त्यांचे फेडरेशन्स यांचा समावेश आहे.अर्ज सादर करण्यासाठी पात्रतेचे निकष, अर्जाचा नमुना इ. माहिती ह्रींींि:/ /्रारींं-ाह.ेस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट घ्यावी किंवा जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक, आत्मा कार्यालय, सांगली येथून घ्यावा, अर्ज परिपूर्ण भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक आत्मा, सांगली कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने सादर करावा. यापूर्वी अर्ज केलेला आहे परंतु सविस्तर प्रकल्प अहवाल (ऋझझ) तयार करण्यासाठी प्राथमिक मंजुरी न मिळालेल्या संस्था तसेच यापूर्वी अर्ज न केलेल्या संस्थानी सदरचा अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक, आत्मा, सांगली यांच्यामार्फत करण्यात आले आहे. प्रथम येणारास प्रथम प्राधान्य दिले जाईल, असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.






# पी.डी.व्ही.पी. महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन दि. १ जानेवारी ते ७ जानेवारी, २०२४ दरम्यान मौजे उपळावी, ता. तासगाव, जि.सांगली या गावात करण्यात आले होते.

या शिबिरात श्रमदान, प्रबोधनपर कार्यक्रम, मनोरंजनपर उपक्रम तसेच महाविद्यालयातील विविध विभागाकडून राबविण्यात आलेले सामाजिक उपक्रम अशा विविध उपक्रमांनी हे शिबीर उत्साहात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन दिनांक १ जानेवारी, २०२४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक माननीय बी. एस. पाटील हे उपस्थित होते. सात दिवसाच्या कालावधीत या शिबिरामध्ये प्रबोधन सत्रात तासगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ वाघ यांचे 'मी असा घडलो' या विषयावर, तासगाव नगरपालिकेचे प्रशासत्तता मुख्याधिकारी पृथ्वीराज माने-पाटील यांचे 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या विषयावर, विधी अधिकारी, ज्येष्ठ विधीज्ञ बी.बी.जाधव यांचे 'ज्येष्ठ नागरिक कायदा' तर विधीज्ञ एस.एस.कणसे यांचे 'जमीन महसूल अधिनियम' या विषयावर, वृक्षमित्र व पत्रकार मा. विनायक कदम यांची प्रगट मुलाखत, कुमठे गावच्या डॉ. उषाकिरण पाटील यांचे महिलांचे आरोग्य व आदर्श जीवनशैली या विषयावर,मा.अजित भोसले यांचे 'बांबू शेती व बांबू हस्त व्यवसायाचे फायदे' या विषयावर मा.प्रदीप (काका) माने - पाटील यांचे 'ग्रामीण विकासात सरपंचांची भूमिका' या विषयावर अशी विविध मान्यवरांची व्याख्याने संपन्न झाली.



तासगाव : येथील पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यावेळी उपस्थित मान्यवर

सात दिवस पार पडलेल्या श्रमदान सत्रात उपळावी गावातील सार्वजनिक ठिकाणी, पाण्याची टाकी, ग्रामपंचायत कार्यालय, सिद्धेश्वर मंदिर व हनुमान मंदिर परिसर, स्मशानभूमी, जि. प. मराठी शाळा व परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच प्लास्टिक मुक्त गाव ही संकल्पना असल्यामुळे गावातील विविध ठिकाणी जाऊन प्लास्टिक संकलित करण्यात आले, तसेच जि प मराठी मुलांची शाळा येथे मुलांसाठी खेळायचे मैदान तयार करण्यात आले.

विशेष उपक्रमांमध्ये दररोज सकाळी 'योग शिबिर' व एड्स, पर्यावरण संतुलन, एकता आदी विषयांवर जाणीव जागृती रॅली काढण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या साधून प्रा. पल्लवी मिरजकर यांनी सावित्रीच्या वेशात येवून ओव्यांचा जागर केला.

यावर्षीच्या शिबिराचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयातील विविध विभागांनी या शिबिरात उस्फुर्त सहभाग घेत विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासली, त्यामध्ये रसायनशास्त्र विभागामार्फत पाणी माती परीक्षण प्राणिशास्त्र विभागामार्फत मधमाशीपालन प्रात्यक्षिकासह वनस्पती शास्त्र विभागामार्फत आंतरराष्ट्रीय तृणधान्य जागृती रॅली, ग्रंथालय विभागामार्फत ग्रंथदिंडी, कम्प्युटर सायन्स विभागामार्फत सायबर सिक्युरिटी जनजागृती रॅली, इंग्रजी विभागामार्फत सॉफ्ट स्किल प्रात्यक्षिक, गणित विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, भौतिकशास्त्र विभागामार्फत टेलिस्कोप द्वारे 'आकाशदर्शन', याबरोबरच इतिहास भूगोल संख्याशास्त्र व पदार्थविज्ञान या विभागांनी मिळून ऊर्जा सर्वेक्षण, जनगनना सर्वेक्षण, सामाजिक व आर्थिक स्थिती,मराठी विभाग मार्फत निबंध स्पर्धा तर सांस्कृतिक विभागामार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या सर्वच उपक्रमांना उपळावीच्या ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला.

शिबिराचा सांगता समारंभ ७ जानेवारी,२०२४ रोजी संपन्न झाला. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठाचे सन्माननीय,संचालक प्रा. डॉ.तानाजी चौगले तसेच राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठाचे सांगली जिल्हा समन्वयक डॉ.पोपटराव माळी यांनी उपस्थित राहून रा.से.यो. स्वयंसेवकांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले, त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास व स्वयंसेवकांची कर्तव्ये स्वयंसेवकांना सांगितली. महाविद्यालयाने उपळावी गावात राबवलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक यावेळी त्यांनी केले. या समारंभास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे तसेच उपळावी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.आशाराणी चंद्रकांत कदम,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचा व सर्व कार्यक्रम अधिकारी यांचा मानाचा फेटा बांधून व श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ देऊन उपळवी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या एन.एस.एस.च्या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. तातोबा बदामे, डॉ.नितीन गायकवाड, डॉ.राहुल काळेल, प्रा.पल्लवी मिरजकर, प्रा.आण्णासाहेब बागल, संजय काळे, विद्यार्थी प्रतिनिधी श्रुती शिंदे तसेच सीनियर स्वयंसेवक ऋषिकेश गणपती जाधव, ऋषिकेश ह. जाधव, सत्यजित मोहिते, सानिका पाटील, सायली माने, गुरुनाथ पाटील, निलेश खराडे आदींनी मेहनत घेतली. यावेळी उपळावी ग्रामस्थांच्या वतीने आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देणारे सरपंच सौ. आशाराणी चंद्रकांत कदम, उपसरपंच पोपट शिंदे, सर्व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्तीचे अध्यक्ष भास्कर पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे संचालक पोपट पाटील, संजय पवार, विश्वास शिंदे आदी मान्यवरांनी शिबीरासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करून दिल्याने हे शिबिर यशस्वीपणे पार पडले.

# मिनी ट्रॅक्टरसाठी अर्ज करावेत : जयंत चाचरकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील बचत गटांना ९० टक्के अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्यांची उपसाधने यांचा पुरवठा करण्याच्या योजनेकरीता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने वाटप करण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील बचत गटांनी निधी उपलब्ध होण्याच्या अधिन राहून निकषानुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यत सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयास अर्ज सादर करावेत. इच्छुक बचत गटांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण कार्यालयाचे सहायक आयुक्त जयंत चाचरकर यांनी केले आहे.



बचत गटांनी अपूर्ण अर्ज सादर केल्यास त्यास निवडी करीता पात्र ठरविण्यात येणार नाही. तसेच याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. इच्छुक अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहायता बचतगटांनी दि.३१ जानेवारी २०२४ पर्यंत परीपूर्ण प्रस्ताव सहायक आयुक्त, समाज कल्याण सांगली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगाव रोड, सांगली येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहनही श्री. चाचरकर यांनी केले आहे.

**योजनेचे निकष**

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहायता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावेत. स्वयंसहायता बचत गटातील ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती घटकातील असावेत. स्वयंसहायता बचत गटाचे अध्यक्ष व सचिव अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. बचत गट नोंदणीकृत असावा.

**प्रस्तावास आवश्यक कागदपत्रे**

स्वयंसहायता बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र (तालुका कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती इ.). स्वयंसहायता बचत गटाच्या नावे असलेले राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स व या खातेशी अध्यक्ष व सचिव यांचे आधारलिंक असलेचा पुरावा. स्वयंसहायता बचत गटाचा ठराव व सभासदांची यादी स्वाक्षरीसह. स्वयंसहायता बचत गटातील सर्व सदस्यांचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे दाखले. स्वयंसहायता बचत गटातील सर्व सभासदांचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले रहिवाशी पुरावे (डोमेसाईल).स्वयंसहायता बचत गटातील सर्व सभासदांचे आधारकार्ड झेरॉक्स. १०० रूपये स्टॅम्पवर ट्रॅक्टर खरेदीबाबतचे हमीपत्र. सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत केलेली असावीत.

# पलूस तालुका कृषि अधिकारी यांना निलंबित करा

## वंचित बहुजन आघाडीची ठिय्या आंदोलनाद्वारे मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पलूस तालुक्यातील कृषि विभागातील औषध फवारणी यंत्र अनुदान प्रकरणी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेश गायगवाळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कृषि अधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.




**सांगली : औषध फवारणी यंत्र अनुदान प्रकरणी पलूस तालुका कृषि अधिकारी यांना निलंबित करा या मागणीसाठी ठिय्या आंदोलन करताना वंचितचे पदाधिकारी**

पलूस तालुक्यातील औषध फवारणी यंत्र प्रकरणात अनेकांनी यंत्र खरेदी न करता शासनाचे अनुदान घेतले असून यातील औषधयंत्र विक्रेत्याला परवानगी नसताना बोगस प्रमाणपत्र तयार करून यंत्र विक्री केली असलेचे निदर्शनास येत आहे तसेच काही शेतकऱ्यांना दिलेले फवारणी यंत्र हे अतिशय निकृष्ट दर्जाचे असलेचे देखील निवेदनात म्हटले आहे.

सदर प्रकरणी ४ महिन्यापासून चौकशी व कारवाईसाठी वंचित बहुजन आघाडी पाठपुरावा करत असून चौकशी समितीने विश्वासात न घेता चुकीचे पद्धतीने तपास केलेने या कार्यालयाचा निषेध व्यक्त करत पुढील १५ दिवसात पलूस तालुका कृषी अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे तसेच बोगस अनुदान लाटणारे व बोगस औषध फवारणी यंत्र विक्रेत्यावर फौजदारी गुन्हे दाखल न झालेस तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष गायगवाळे यांनी दिला. यावेळी वंचित कामगार संघटनेचे नेते संजय कांबळे, अक्षय बनसोडे, स्वप्नील खांडेकर, विशाल धेंडे, जगदीश कांबळे, परशुराम कांबळे, शाकिब पटेल यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# काँग्रेस नेते सुनील केदार यांना हायकोर्टाकडून जामीन मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी शिक्षा सुनावलेले काँग्रेस नेते सुनील केदार यांच्याबद्दल महत्वाची अपडेट समोर आली आहे. माजी मंत्री सुनील केदार यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मोठा दिलासा दिला असून त्यांचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला आहे. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके यांनी हा निर्णय दिला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, १५० कोटींच्या नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सुनील केदार यांना जिल्हा न्यायालयाने दोषी ठरवले होते. याप्रकरणी न्यायालयाने त्यांना १२ लाख ५० हजारांचा दंड आणि ५ वर्ष सक्षम कारावासाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात सुनील केदार यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जामीनासाठी अर्ज केला होता. सुनील केदार यांच्या जामीन अर्जावर आणि शिक्षेला स्थगिती देण्याच्या अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुनावणी झाली. ज्यामध्ये एक लाखाच्या जातमुचलक्यावर सुनील केदार यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.



सुनील केदार

तसेच प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सत्र न्यायालयात हजर राहण्याचे आदेशही दिले आहेत.

नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती उर्मिला जोशी यांच्या एकल खंडपीठाने हा निर्णय दिला. सुनील केदार यांच्या जमीन अर्जावर दोन्ही पक्षाकडून जोरदार युक्तिवाद झाला. सुनील केदार यांच्याकडून प्रसिद्ध वकील सुनील मनोहर यांनी युक्तिवाद केला तर राज्य सरकारकडून वकील राजा ठाकरे यांनी बाजू मांडली. राज्य सरकारने या जामीन अर्जाला विरोध केला आहे.





# 'टीसीएस' कंपनीच्या कर्मचाऱ्याचे नातलग गुणवत्ता यादीत

**नागपूर :** तलाठी भरती परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर अनेक धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. परीक्षा घेणाऱ्या टीसीएस कंपनीतील एका कर्मचाऱ्याची पत्नी आणि बहिणीचा पती गुणवत्ता यादीमध्ये पहिला आल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने केला आहे.

तलाठी भरती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. त्यात अनेक उमेदवारांना एकूण २०० गुणांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. 'नॉर्मलायझेशन' नंतर गुणवाढ झाल्याचे सांगितले जात आहे. परंतु, तलाठी भरती प्रक्रियेत पेपर फुटीच्या घटना घडल्याचे उघड झाले होते. त्यात आता स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने स्पर्धा परीक्षेशी कोणताही संबंध नसलेला एक टॅक्सीचालक आणि एक गृहिणी यांना अनुक्रमे २०८ आणि १९८ गुण कसे मिळाले, असा प्रश्न स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने उपस्थित केला आहे. ठाणे जिल्ह्याच्या यादीमध्ये हे दोन्ही उमेदवार पहिले आले असून ते टीसीएसमधील कर्मचाऱ्याचे नातेवाईक असल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने 'एक्स'वरील संदेशाद्वारे केला आहे. तलाठी भरती परीक्षा घेणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्याच्या पत्नीला १९८ आणि बहिणीच्या पतीला २०८ गुण मिळाल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने केला आहे.


या प्रकाराबद्दल प्रतिक्रियेसाठी टीसीएस कंपनीचे विभागीय विपणन प्रमुख दीपांकर बॅनर्जी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी "प्रसार माध्यमांना उत्तर देण्यास मी बांधील नाही, आम्ही फक्त परीक्षा घेणाऱ्या शासकीय विभागांना उत्तर देऊ शकतो," असे सांगून अधिक बोलण्यास नकार दिला. विशेष म्हणजे, शासन निर्णयात बॅनर्जी यांचा संपर्क क्रमांक देण्यात आला आहे. याप्रकरणी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.




# प्रकाश आंबेडकर इंडिया आघाडी आणि मविआत : संजय राऊत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** इंडिया आघाडी, महाविकास आघाडीचे नेते यांची दिल्लीत बैठक पार पडलीमुकुल वासनिक यांच्या निवासस्थानी आमची चर्चा झाली. अशोक चव्हाण, सलमान खुर्शीद, जितेंद्र आव्हाड, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, तसंच विनायक राऊत आणि मी आम्ही सगळ्यांनी चर्चा केली. संघर्षाच्या या काळात आम्ही एकत्र आहोत आणि यापुढेही एकत्र राहू. महाराष्ट्रात इंडिया आघाडीच्या लोकसभेला सर्वाधिक जागा येतील असंही राऊत यांनी म्हटलं आहे. जागावाटपावरुन आमच्यात कुठलेही मतभेद नाहीत. आम्हा सगळ्यांची चर्चा सकारात्मक झाली असंही आज संजय राऊत यांनी सांगितलं. तसंच प्रकाश आंबेडकर यांना इंडिया आघाडीत घेण्यावर आमचं एकमत झालं आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं. जागा कुणाच्या किती असतील त्यावर नंतर चर्चा करु असंही संजय राऊत म्हणाले.



प्रकाश आंबेडकर

वंचित बहुजन आघाडीबाबत आम्ही विस्ताराने चर्चा झाली. प्रकाश आंबेडकर आणि वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत सहभागी करुन घेण्यावर आमचं एकमत झालं आहे. आज आम्ही महाराष्ट्रातल्या जागांवर चर्चा केली. वंचित आघाडी महाविकास आघाडीचा भाग असणार आहे यात कुठलंही दुमत नाही. असं संजय राऊत म्हणाले आहेत.

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी युती केलीच होती. त्यानंतर त्यांचा प्रवेश महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत होणार का? हे पाहणं महत्त्वाचं होतं. आता लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जी बैठक दिल्लीत पार पडली त्यात प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत घेण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

